# 16 .स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड.
# सांस्कृतिक विभाग




सावरकर महोत्सव २०२० समारोप प्रसंगी उपस्थित अप्पर पोलीस अधिक्षक, बीड श्री.विजय कबाडे,संस्थेचे सहकार्यवाह प्रा.चंद्रकांतजी मुळे, स्थानिक अध्यक्ष श्री.गोविंदप्रसादजी बार्शीकर,महाविद्यालयीन समिती सदस्य पत्रकार श्री.महेश वाघमारे आणि प्राचार्य डॉ.संजय शिरोडकर



महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी चित्रपट कलाकार महादेव सवाई याच्या बायको बायको या चित्रपटाचे प्रमोशन सावरकर महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




सावरकर महाविद्यायाची विद्यार्थिनी कु. रसिका बाहेती हिने डॉक बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद २०१७-१८ च्या केंद्रीय युवक महोत्सवात ललित कला प्रकारात रांगोळी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला .



**सावरकर संकुलाच्या जानेवारी २०१९ च्या वार्षिक शिक्षक शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापकांनी जयोस्तुते या देशभक्तीपर गीतावर नृत्यअविष्कार सादर केला .**







**चित्रपट अभिनेते ,खलनायक सयाजी शिंदे यांच्या प्रयत्नातून उभे राहिलेल्या देवराई वनराई, बीड येथे जगातील पहिली अनोखी वृक्ष सुंदरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात अनेक महाविद्यालयीन युवतींनी सहभाग घेतला. यातून दहा वृक्ष सुंदर यांची निवड करण्यात आली होती. यात महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. वैष्णवी मुळे हिची निवड झाली.**




सावरकर महोत्सव २०२० च्या निमित्ताने फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सौ. वैशाली झंवर आणि सौ. वैशाली देशपांडे, डॉ. प्रशांत तालखेडकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलेल. तसेच प्रा. दीपा देशपांडे आणि प्रा. अनुजा कास्तीकर यांनी या स्पर्धेचे उत्तम आयोजन केले. खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली.
आदित्य वीर-निळू फुले, ऋतुजा आंबेकर-घुमर-पद्मावती,सायली आरे-दाक्षिणात्य स्त्री,संदेश कानडे-नटसम्राट
गणेश शिंदे-शिव तांडव












सावरकर महोत्सव 2020 निमित्त महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. या संगीत रजनी मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, प्राध्यापकांची मुले सर्वांनी सहभाग नोंदवून गीते सादर केली.



सावरकर परिवारातील प्रसिद्ध गायक शाम शशिकांत जोशी, मुंबई यांनी सांस्कृतिक विभागास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने पु.ल.देशपांडे जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्टॅन्ड अप कॉमेडी स्पर्धा-२०१९ या महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यावतीने बीड जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने दही हंडी कार्यक्रम दिनांक 26 ऑगस्ट २०१९ रोजी घेण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दही हंडीचा सराव क्रीडा विभागाच्या वतीने घेऊन दही हंडी फोडण्यात आली.




सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने २९ ऑगस्ट २०१९ रोजी बीड शहर पातळीवर श्रावण साज स्पर्धा घेण्यात आली . या स्पर्धेच्या परीक्षक म्हणून झंवर आणि वैशाली नहार यांनी काम केले .







**सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने कृष्ण सुदामा मैत्री दिन ( ३ ऑगस्ट २०१९) आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी आणि प्रिय मैत्रिणी १.ऋचा विडेकर आणि २.नेहा वेदपाठक उपस्थित होत्या. त्या प्रसंगी विद्यार्थिनींनी काढलेली रांगोळी**















**सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त मध्व राम मंदीर भजनी मंडळाचे समाज प्रबोधनपर भजन आयोजित करण्यात आले होते.**यात सौ.आशा खंडेराव पत्की, सौ. रत्ना तालखेडकर, सौ. मंगल पांडव.,सौ. कुमोदिनी बाहेगव्हाणकर, सौ. मंगल धारूरकर , सौ. शोभा निमगावकर, सौ. सुमन सिरसालकर, सौ. मीना काळे, सौ. उज्वला बाभुळगावकर, कमलताई देशमुख यांनी भजन सादर केले.







सावरकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली होती.

रुख्मिणी-वैष्णवी मुळे, विठ्ठल-गणेश शिंदे




मोहरक्या या मराठी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आलेल्या (आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त) ग्रुप सोबत मागदर्शक प्रा . गव्हाणे व प्रा प्रशांत तालखेडकर





**महिला महाविद्यालय, बीड द्वारा आयोजित जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धेत विद्यार्थिनी पूजा गेहलोत हिला प्रथम क्रमांक मिळाला.**